जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी
27 OCT 2023

# विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर परीक्षेला ३२ हजार ६४७ विद्यार्थी




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी गुरुवारी ३२ हजार ६४७ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठ हिवाळी सत्रातील विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांना प्रारंभ झाला आहे. विद्यापीठाच्या वतीने सुमारे ६०० हून अधिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. सुमारे २ लाख ५० हजार विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. सध्या पारंपरिक अभ्यासक्रमांच्या (बीए, बीकॉम, बीएस्सी, बी. व्होक.) परीक्षा सुरू आहेत. नोव्हेंबरमध्ये अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, आर्किटेक्चर या अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू होणार आहेत. जानेवारी २०२४ पर्यंत सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा चालतील. परीक्षा संपल्यावर तत्काळ निकाल जाहीर केला जाणार आहे. आर्टस्‌मधील (अर्थशास्त्र) ३७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा गुरुवारी (दि. २६) वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे झाल्याची माहिती परीक्षा विभागाने दिली.